# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय आवार, रुम नं.१,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपती शिवाजी टर्मिनस समोर, मुंबई-४०० ००१.
Email : mah-sforum@nic.inदूरध्वनी क्र.०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२०१८५३९ (फॅक्स)

| e-mail : mah-sforum@nic.in | टेलि फॅक्स क्र. : २२०१ ८५ ३९ | दूरध्वनी क्र. २२०५ ७४ ०९ |
|---|---|---|


जा.क्र.राआ/लेखा/शासकीय वाहन लिलाव विक्री/२०१७/२६५१  दिनांक :- १५/०५/२०१७

विषय :- या कार्यालयातील शासकीय वाहन क्र.एमएच-०१/ए.एन.-१० फियाट लिनिया या वाहनाची लिलावाने विक्री करण्याबाबत.

सर्व जनतेच्या माहितीसाठी या सुचनेद्वारे जाहीर करण्यात येते की, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई या कार्यालयाच्या मालकीच्या फियाट लिनिया या निरुपयोगी वाहनाची जाहीर रित्या लिलाव करावयाचा असून त्यांच्या अटी व शर्ती www.grahak.maharashra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. फियाट लिनिया या वाहनाची माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | लिलावाद्वारे निकालात काढावयाचे वाहन | वाहन खरेदी वर्ष | कंपनी मेक | वाहन विक्रीची प्रारंभीक किंमत रु. | हर्रास (विक्री)दिनांक | वाहन पाहण्याकरिता व लिलाव करीता कार्यवाहीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| १ | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई | एम.एच-०१/ ए.एन.-१० फियाट लिनिया (पेट्रोल) | जानेवारी २०१० | फियाट लिनिया | रु.२,८३,५८६/- | दिनांक. ०८.०६.२०१७ | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई जूने प्रशासकीय महाविद्यालय आवार रुम नं.१,२,२ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,सी.एस.टी.समोर, मुंबई ४०० ००१ |

## वाहन जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती

१) इच्छुक बोलिदारांना लिलावात काढलेले वाहन लिलावापुर्वी जाहीरातीच्या दिनांकापासून ०८ दिवसापर्यंत पहावयास मिळतील.

२) वाहन आहे त्या स्थितीत पहावयास मिळेल व त्यांच स्थितीत ताब्यात घ्यावा लागेल.

३)कोणत्याही मंजुर लिलाव बोलीधारकांच्या लिलाव व कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अधिकार प्रबंधक (प्रशासन), राज्य आयोग, मुंबई यांना राहील व प्रबंधक (प्रशासन), राज्य आयोग, मुंबई यांनी घेतलेला निर्णय हा अंतीम निर्णय राहील.

४) वाहन लिलावात भाग घेण्याकरीता रु.५००/- ची लिलाव फी व अनामत रक्कम रु.१०००/- असे एकूण रु.१५००/- दिनांक ०८/०६/२०१७ रोजी ११.०० वाजता पर्यंत राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई, जुने प्रशासकीय महाविद्यालय आवार, रुम नं.१,२,५ व ६ सी.एस.टी. स्टेशन समोर, मुंबई-४०० ००१ येथे जमा करावी लागेल व त्याशिवाय वाहन लिलावात बोली बोलता येणार नाही.

५) ज्याची लिलाव स्विकारण्यात येईल त्यांनी त्याच दिवशाी वाहन खरेदीच्या २५ टक्के रक्कम रोखीने त्वरीत भरावे लागेल ती न भरल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदर लिलाव रद्द करण्यात येऊन मालाचा किंवा वाहनाचा पुन्हा जाहीर लिलाव करण्यात येईल.

६) लिलाव कायम केल्याबद्दल बोलीदारास कळविण्यात आल्यापासून १० दिवसाचे आत त्याने उर्वरीत रक्कमेचा भरणा करणे आवश्यक आहे. उर्वरीत रक्कम ठरवून दिलेल्या १० दिवसाच्या मुदती न भरल्यास १३ टक्के दराने व्याज आकारण्यात येईल. त्यानंतरही सदर रक्कम १५ दिवसाचे आत न भरल्यास अनामत रक्कम व वाहन खरेदी करीता भरलेली २५ टकके रक्कम व इतर जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल व विक्री रद्द करुन सदर वाहनाचा पुन्हा लिलाव करण्यात येईल.

७) लिलाव धारकाने पुर्ण रक्कमेचा भरणा केल्यावर संबंधित वाहन १५ दिवसाचे आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घ्यावे तद्नंतर प्रतिदिन १००/- (रुपये शंभर फक्त) दंड आकारण्यात येईल. ३० दिवसाचे आत वाहन ताब्यात न घेतल्यास समितीला लिलाव रद्द करण्याचा अधिकार राहील. संबंधित लिलाव खरेदीदाराची अनामत रक्कम व ९० दिवसाची दंडाची रक्कम वसुल करुन उर्वरीत रक्कम परत करण्यात येईल. याबाबत लिलावधारकास न्यायालयात किंवा इतर ठिकाणी दाद मागता येणार नाही.

८) लिलाव खरेदीदाराने माल ताब्यात घेतांना या कार्यालयाच्या आवारातील मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदीदाराला झालेल्या नुकसानीबाबत जबाबदार धरण्यात येऊन नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल.

९) यशस्वी लिलाव बोलीधारकाला विकत घेतलेल्या वाहनाच्या खरेदीच्या रक्कमेवर नियमानुसार विक्रीकर, व्हॅट व इतर सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. कोणतेही सुट मिळण्याचे प्रमाणपत्र लिलाव खरेदीदाराला मिळणार नाही.

१०) लिलाव जाहीर केलेल्या वाहनाचा लिलाव कोणतेही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार प्रबंधक (प्रशासन),राज्य आयोग, मुंबई यांचे कडे राखून ठेवण्यात आले आहे याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

११) यशस्वी लिलाव बोलीधारकांची रक्कम सोडून इतर लिलाव बोधीधारकाची अनामत रक्कम रु.१०००/- परत करण्यात येईल.

१२) लिलाव जर शासनाने/समितीने ठरविलेल्या किंमान वाजवी किंमतीपेक्षा कमी येत असल्यास नव्याने जाहीर लिलाव करण्याचे अधिकार कोणतही कारण न देता वेळेवर स्थगित करण्याचा अधिकार प्रबंधक (प्रशासन),राज्य आयोग, मुंबई यांचे कडे राखुन ठेवण्यात आले आहे. याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही. यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

१३) वाहन घेतलेनंतर हस्तांतरण वैगरेचें सर्व कार्यवाही वाहन घेण्या-यास स्व खर्चाने करावी लागेल.

१४) वाहनांचा ताबा दिल्यानंतर वाहनाची सर्वस्वी जबाबदारी खरेदीदाराची राहील व नंतर वाहनासबंबंधी होणा-या कोणत्याही विपरीत परिणामास हे आयोग जबाबदार राहणार नाही.

१५) लिलावामध्ये शासकीय अधिकारी /कर्मचारी यांना भाग घेता येणार नाही.

१६) सदर वाहन निकामी व भंगार अवस्थेत लिलाव करावयाच्या असल्याने परिवहन खात्यात वाहने हस्तांतरीत करावयाची असल्यास खर्च व उचित प्रक्रीया ही खरेदीदारासच करावी लागेल.

१७)सदरचे वाहन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई, जुने प्रशासकीय महाविद्यालय आवार, रुम नं.१,२,५ व ६ सी.एस.टी. स्टेशन समोर, मुंबई-४०० ००१ या कार्यालयाच्या आवारात कार्यालयीन वेळेत पाहणीसाठी उपलब्ध आहे.

१८) वाहन लिलावाच्या दिवशी बोलीदारांनी वाहनाची तपासणी केली आहे. असे गृहीत धरण्यात येऊन नंतर वाहनाची कोणतीही तक्रार स्वीकारली जाणार नाही.

१९) यशस्वी बोलीदाराकडून २५ टक्के रक्कमेचा भरणा केल्यानंतर पुर्ण रक्कम भरेपर्यंत लिलावाच्या साहित्याची जबाबदारी बोलीदाराची राहील व त्यास राज्य आयोग,मुंबई हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

२०) संपुर्ण रक्कमेचा भरणा केल्यावर वाहन ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणावरुन आहे, त्या स्थितीत पंधरा दिवसाचे आत (सुटीचे दिवसाव्यतीरिक्त) कार्यालयीन वेळेत नियमानुसार ताब्यात घ्यावे लागेल.

२१) लिलावाच्या अटी व शर्ती पुर्ण न केल्यास अनामत रक्कम शासन खाती जमा करण्यात येईल.

(स.ज्ञा.पवार)
प्रबंधक, (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,
महाराष्ट्र, मुंबई.